पुढारी

# ज्येष्ठांनाही पीएच.डी. करण्याची संधी

## 'यूजीसी'चे उपाध्यक्ष प्रा. डॉ. पटवर्धन; नियमावलीसाठी समिती नियुक्त

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जे ज्येष्ठ नागरिक केवळ ज्ञानार्जनाच्या आनंदासाठी पीएच.डी.चे संशोधन करू इच्छितात त्यांना वय, शिक्षण आदी कोणतीही अट न लावता त्यांना संशोधनाची मुभा देण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) सकारात्मक आहे. या संदर्भातील नियमावली ठरविण्यासाठी आयोगाने स्वतंत्र समिती नियुक्त केली आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलपती उद्यानाच्या नामफलकाचे अनावरण करताना 'यूजीसी'चे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

शिवाजी विद्यापीठात अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख व संचालक यांच्यासमवेत शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आयोजित बैठकीमध्ये ते बोलत होते. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. पटवर्धन म्हणाले, यूजीसीने शैक्षणिक संस्थांसाठीचा दर्जा सुधारणा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे ठरविले आहे. शैक्षणिक संस्थांचे क्षमता संवर्धन, संशोधनाची दर्जावृद्धी, मानव्यविद्या व भाषा विषयांमधील संशोधनास प्रोत्साहन, विद्यार्थीकेंद्री अध्ययन पद्धती, शिक्षकांसाठी क्षमता संवर्धन कार्यक्रम या पंचसूत्रीच्या आधारे यूजीसीने भविष्यात वाटचाल करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मूळ प्रवेशित शिक्षण संस्थेबरोबरच सुटीच्या कालावधीत अन्य ठिकाणाहून एखादा अभ्यासक्रम केल्यास त्याचे क्रेडिट गुण त्याला मिळावेत, यासाठी 'नॅशनल ॲकॅडेमिक क्रेडिट बँक' हा एक अभिनव उपक्रम विचाराधीन असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते. दरम्यान, बैठकीनंतर डॉ. पटवर्धन यांच्या हस्ते कुलपती उद्यानाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले.

# ज्येष्ठांना पीएच.डी. संशोधनाची संधी

## डॉ. भूषण पटवर्धन । युजीसी सकारात्मक : शिवाजी विद्यापीठात बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्येष्ठ नागरिक केवळ ज्ञानार्जनाच्या आनंदासाठी पीएच.डी.चे संशोधन करु इच्छितात, त्यांना वय, शिक्षण, आदी कोणतीही अट न लावता त्यांना संशोधनाची मुभा देण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) सकारात्मक आहे. यासंदर्भातील आयोगाने स्वतंत्र समिती नियुक्त केली आहे, अशी माहिती नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन दिली.




शिवाजी विद्यापीठाच्या कुलपती उद्यानाच्या नामफलकाचे अनावरण डॉ. भूषण पटवर्धन यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, व्ही. टी. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठातील अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख आणि संचालक यांच्याशी शैक्षणिक धोरणांच्या अनुषंगाने आयोजित बैठकीमध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. पटवर्धन म्हणाले, राष्ट्रीय महत्त्वाचे उपक्रमही हाती घेण्यास विद्यापीठांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. विशेषत: मानव्यविद्या, भाषा, भाषाविज्ञान यांसारख्या विद्याशाखांसाठीही भरघोस तरतूद करुन त्यासंदर्भातील संशोधनाला चालना देण्याचे धोरण 'युजीसी'ने स्वीकारले आहे.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठाने आजपर्यंत युजीसीच्या विविध उपक्रम, प्रकल्पांत सक्रिय सहभाग दर्शविला आहे. येथून पुढील काळातही नूतन उपक्रमांतही हिरीरिने सहभागी होईल.

प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी यावेळी स्वागत व परिचय करून दिला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, व्ही. टी. पाटील यांच्यासह अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, आदी उपस्थित होते.

### क्रेडिट गुण...

विद्यार्थ्यांनी त्यांच्या मूळ प्रवेशित शिक्षण संस्थेबरोबरच सुटीच्या कालावधीत अन्य ठिकाणांहून जरी एखादा अभ्यासक्रम केला, तर त्याचे क्रेडिट गुण त्याला मिळावेत, यासाठी नॅशनल अकॅडेमिक क्रेडिट बँक हा एक अभिनव उपक्रम युजीसीच्या विचाराधीन असल्याचेही डॉ. पटवर्धन यांनी सांगितले.

### नामफलकाचे अनावरण

बैठकीनंतर डॉ. पटवर्धन यांच्या हस्ते कुलपती उद्यानाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. त्याचप्रमाणे या उद्यानात त्यांच्या हस्ते नारळाचे रोप लावण्यात आले. यावेळी उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधीक्षक जाधव उपस्थित होते.

10 MAR 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यूजीसी ज्येष्ठांना संशोधनाची संधी देणार

## डॉ. भूषण पटवर्धन यांची माहिती : शिवाजी विद्यापीठातील अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख आणि संचालकांसमेवत बैठक

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
जे ज्येष्ठ नागरिक केवळ ज्ञानार्जनाच्या आनंदासाठी पीएच.डी.चे संशोधन करू इच्छितात, त्यांना वय, शिक्षण आदी कोणतीही अट न लावता संशोधनाची मुभा देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) सकारात्मक आहे. यासंदर्भातील सविस्तर नियमावली ठरवण्यासाठी आयोगाने स्वतंत्र समिती नियुक्त केली आहे, अशी माहिती नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी दिली.

शनिवारी शिवाजी विद्यापीठातील अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख आणि संचालक यांच्या बैठकीत ते बोलत होते.

डॉ. पटवर्धन म्हणाले, सध्याचे पीएच.डी.चे निकष हे पात्रता ठरवण्यासाठीचे असल्यामुळे कठोर आहेत. तथापि, अनेक विद्यापीठांकडे ज्येष्ठ नागरिक किंवा विविध क्षेत्रांत भरीव योगदान देत असलेले कलाकार, मान्यवर येत असतात, ज्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात पीएच.डी. करावयाची असते. या संशोधन कामाचा त्यांना नोकरीसाठी अगर अन्य कारणांसाठी कोणताही लाभ मिळवावयाचा नसतो. केवळ ज्ञानार्जनाची आस त्यामागे असते. अशा ज्येष्ठांना प्रचलित पीएच.डी.चे निकष, नियम शिथिल करून संशोधनाची परवानगी देण्याची बाब यूजीसीच्या विचाराधीन होती. त्यानुसार आयोगाने एक स्वतंत्र समिती नेमून यासाठीचे धोरण निश्चित करण्यासाठी पावले उचलली आहेत. याचा समाजातल्या अनेक लोकांना लाभ होईल. त्याचप्रमाणे त्यांच्या अनुभवाचेही संशोधनाच्या रूपाने संचित निर्माण होईल.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आजपर्यंत यूजीसीच्या विविध उपक्रमांत, प्रकल्पांत सक्रिय सहभाग दर्शवला आहे. येथून पुढील काळातही यूजीसीच्या सर्व नूतन उपक्रमांत विद्यापीठ हिरिरीने सहभागी होईल.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी यावेळी स्वागत करून परिचय करून दिला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख उपस्थित होते.

या बैठकीनंतर डॉ. पटवर्धन यांच्या हस्ते कुलपती उद्यानाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. त्याचप्रमाणे हा उद्यानात त्यांच्या हस्ते नारळाचे रोप लावण्यात आले. यावेळी उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलपती उद्यानाच्या नामफलकाचे अनावरण करताना डॉ. भूषण पटवर्धन, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.**

### यूजीसीची पंचसूत्री

शैक्षणिक संस्थांचे क्षमता संवर्धन, संशोधनाची दर्जावृद्धी, मानव्यविद्या व भाषा विषयांमधील संशोधनास प्रोत्साहन, विद्यार्थिकेंद्री अध्ययन पद्धती, शिक्षकांसाठी क्षमता संवर्धन कार्यक्रम या पंचसूत्रीच्या आधारे यूजीसीने भविष्यातील वाटचाल करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी भरीव निधीचीही तरतूद करण्यात येणार आहे. विशेषतः मानव्यविद्या, भाषाविज्ञान यांसारख्या दुर्लक्षित किंवा कमी निधी दिल्या जात असलेल्या विद्याशाखांसाठीही भरघोस तरतूद करून त्यासंदर्भातील संशोधनाला चालना देण्याचे धोरण यूजीसीने स्वीकारले आहे, असे डॉ. पटवर्धन यांनी सांगितले.

### 'नॅशनल ॲकॅडमिक क्रेडिट बँक' उपक्रम

विद्यार्थ्यांनी त्यांच्या मूळ प्रवेशित शिक्षण संस्थेबरोबरच सुटीच्या कालावधीत अन्य ठिकाणाहून जरी एखादा अभ्यासक्रम केला, तर त्याचे क्रेडिट गुण त्याला मिळावेत, यासाठी 'नॅशनल ॲकॅडमिक क्रेडिट बँक' हा एक अभिनव उपक्रम यूजीसीच्या विचाराधीन आहे, अशी माहितीही डॉ. पटवर्धन यांनी यावेळी दिली.

10 MAR 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माहिती सुरक्षित ठेवण्याचे आव्हान

## डॉ. एन. बी. दहीभाते : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर / प्रतिनिधी :

वेब सामग्री, माहितीची सुरक्षितता टिकवून ठेवणे हे नजीकच्या काळात मोठे आव्हान असणार आहे. त्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन नॅशनल केमिकल लॅबोरेटरीच्या (पुणे) ग्रंथालयाचे निवृत्त प्राचार्य तथा तांत्रिकी अधिकारी डॉ. एन. बी. दहीभाते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात 'इमर्जिंग ट्रेंड्स अँड टेक्नॉलॉजीज इन लायब्ररी अँण्ड इन्फॉर्मेशन सायन्स' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद झाली, यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. दहीभाते म्हणाले, औद्योगिक क्रांतीनंतर आताच्या युगात आयसीटी आणि इंटरनेट अधिक लोकप्रिय झाले आहेत. त्याचबरोबर दूरशिक्षण, ई-लर्निंग या औपचारिक शिक्षण प्रणाली पुढे आल्या. आयसीटी आणि इतर अनेक तंत्रज्ञानामुळे ई-लर्निंग प्रक्रिया पूर्णपणे व्यवस्थापित करणे शक्य झाले आहे. आयसीटीमध्ये ट्युटोरियल, ट्युशन्स, ट्यूटर, टेक्स्ट, टेस्ट, टेक्नॉलॉजी, टूल्स आणि टीचिंग या आठ 'टी' पद्धतींचा समावेश होतो. वापरकर्ते तंत्रज्ञानामध्ये अधिक तरबेज आहेत. त्यामुळे त्यांच्या समस्यांना तोंड देण्यासाठी आपणास सातत्याने अद्ययावत होणे आवश्यक आहे. वापरकर्त्यांना आकर्षित करण्यासाठी विविध सोयी-सुविधांचा अवलंब केला पाहिजे. त्यासाठी लायब्ररीमधील अनेक उपक्रमांची सेवा एकाच क्लिकवर देण्यासाठी प्रयत्न



होणे आवश्यक आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, बदलत्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि मानसिकता बदल ही ग्रंथालय आणि माहिती विज्ञानापुढील मूलभूत आव्हाने आहेत. आपल्या देशामध्ये दीडशे कोटी मोबाईल असून पंचाऐंशी टक्के वापरकर्ते आहेत. ई-लर्निंगच्याही पुढे जाऊन आता आता एम-लर्निंगचा जमाना आला आहे. दररोज किमान तीन तास मोबाईलचा वापर केला जात आहे. अशा वेळी आपण विशिष्ट प्रकारचे सॉफ्टवेअर तयार करावे, जेणेकरून वापरकर्ते मोबाईलद्वारे लायब्ररीमधील ज्ञान आणि संसाधनांचा उपयोग संशोधनासाठी करतील.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. शालिनी लिहितकर यांनी स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. एन. बी. खोत यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले. यावेळी अक्कमहादेवी महिला विद्यापीठ, विजापूरचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. जी. तडसद, पी. जे. टी. एस. कृषी विद्यापीठ, हैदराबादचे ग्रंथपाल डॉ. के. विरनजेनिल्यू यांच्यासह विविध ठिकाणचे ९० हून अधिक सदस्य परिषदेत सहभागी झाले.

### 'शोधगंगा'वरील शोधप्रबंधांचे लोकार्पण

सन १९६४ ते २०१८ च्या अखेरपर्यंत शिवाजी विद्यापीठास सादर करण्यात आलेले ३४९६ शोधप्रबंध 'इन्फ्लिबनेट'च्या 'शोधगंगा' या राष्ट्रीय रिपॉझिटरी पोर्टलवर उपलब्ध करण्यात आले आहेत. यावेळी त्यांचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते औपचारिक लोकार्पण करण्यात आले. यावेळी प्रोक्वेस्ट या कंपनीचे दास, आनंदिता सेनगुप्ता व सचिन मोरे आदी उपस्थित होते.

10 MAR 2010

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# महिलांच्या प्रश्नांसाठी समाजाने मानसिकता बदलावी

## डॉ. क्रांती जेजुरकर : विद्यापीठात बेटी बचाओ अभियान कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महिलांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने सामाजिक भान जागरूक ठेवून पाहिले पाहिजे. यासाठी समाजाने मानसिकतेमध्ये बदल करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या डॉ. क्रांती जेजुरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचाव अभियानांतर्गत' जागतिक महिला दिनाचे आयोजन भाषा भवन सभागृहामध्ये करण्यात आले होते. यावेळी डॉ. जेजुरकर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. यावेळी कोल्हापूर सामाजिक कल्याण संघटनेच्या अध्यक्षा प्रतिमा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. जेजुरकर म्हणाल्या, महिलांनी सर्व क्षेत्रामध्ये वर्चस्व मिळविले आहे, त्यामुळे मुलगी नको ही भूमिका अमान्य झाली पाहिजे. उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करून समाजामध्ये प्रगल्भता निर्माण करणे आवश्यक आहे.

यावेळी बेटी बचाव अभियानामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणारे महाविद्यालये, पथनाट्य सादरीकरणारे संघांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. लघुनाटिका व पोवाडा विनायक लोहार यांच्या संघाने सादर केले. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. व्ही. वाळवेकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विकास मस्के, बेटी बचाव अभियानाच्या ब्रँड ॲम्बॅसिडर तेरा उस्मान खान आदी उपस्थित होते.